दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.४ जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १३१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 4 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 131 | Pages 4 | Rate 4 Rs

राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अहवालानंतरच इतर ऐच्छिक भाषांबाबत निर्णय

यावेळी संमेलनाच्या उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग, स्वागताध्यक्ष तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. ताराबाई भवाळकर, आमदार अतुल भोसले, मनोज घोरपडे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नगराध्यक्ष अमोल मोहिते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, उद्योजक उद्योजक व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर, जिल्हाधिकारी संतोष पाटील आदींसह तसेच साहित्य महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.विश्वास पाटील यांची 'पानिपत' कादंबरी वाचताना आपल्या विचारविश्वावर खोल परिणाम झाल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, मराठी मातीशी प्रामाणिक राहून इतिहास, समाज आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारे साहित्य निर्माण होणे हीच मराठी साहित्याची खरी ओळख आहे. वारकरी साहित्य, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या योगदानाचा गौरव करताना संत तुकाराम महाराजांचे विचार आणि 'शब्देचि रत्ने' ही परंपरा आजही समाजाला दिशा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय दर्जा दिला, याची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले की, मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून, आता मराठीच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. मात्र केवळ दर्जा मिळवणे पुरेसे नसून मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हे आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जेएनयूसारख्या संस्थांमध्ये मराठी अध्यासन सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.भाषाविषयक धोरण स्पष्ट करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मराठी भाषेची सक्ती असेल; मात्र इतर कोणत्याही भारतीय भाषेची सक्ती केली जाणार नाही. इतर भाषा ऐच्छिक असतील. यासंदर्भात अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, तिचा अहवाल अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले.आपण मुख्यमंत्री असताना मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत मुख्यमंत्री म्हणाले की, साहित्यिकांनी राजकारणात यावे; मात्र साहित्य क्षेत्रात राजकारण आणू नये. साहित्य निर्मिती ही समाजाच्या जाणिवा विस्तारण्यासाठी असते. त्यामुळे टीका आणि गौरव या दोन्हींतून सुधारण्याचा मार्ग शोधला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.साताऱ्याच्या साहित्यिक परंपरेचा गौरव करताना मुख्यमंत्री म्हणाले की, आजवर झालेल्या ९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपैकी सर्वाधिक सहा संमेलनांचे आयोजन सातारा जिल्ह्यात झाले असून, सर्वाधिक १७ संमेलनाध्यक्ष हे सातारा जिल्ह्याचे भूमीपुत्र होते.संमेलनाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा, मावळ फाउंडेशन, सातारा तसेच सहभागी सर्व संस्थांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले. या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी साहित्याला नवी ऊर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांनी राष्ट्रीय स्तरावरील मराठी साहित्याचा आढावा घेताना कवी नामदेव ढसाळ, मलिका अमर शेख, उर्मिला पवार, शरणकुमार लिंबाळे, विजय तेंडुलकर आणि महेश एलकुंचवार यांच्या साहित्य व नाटकांचा गौरव केला.९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात साताऱ्याचा गौरवशाली इतिहास उद्धृत करून मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, सातारा जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान आणि आपल्याला लिहते करणाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

सातारा (प्रतिनिधी): राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील. इतर कोणतीही भारतीय भाषा अनिवार्य नसेल, ती ऐच्छिक स्वरूपात राहील. इतर भाषा कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राचा आत्मा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

चौसाळा बसस्थानका शेजारीच अवैध हातभट्टी दारुचा महापुर

बीडचा दारु बंदी विभाग फक्त नावालाच

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे हातभट्टी दारुची खुलेआमपणे विक्री केली जात असुन याकडे बीडचे दारु बंदी विभागाचे कायम दुर्लक्ष होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे याबाबत अधिक माहीती अशी की, बीड तालुक्यातील चौसाळा येथील बसस्थानका जवळच हातभट्टी नावाची केमीकल युक्त दारुची खुलेआमपणे विक्री केली जात असुन याकडे बीडचे दारु बंदी विभाग कायम डोळेझाक करत असल्यामुळे दारु बंदी विभागाच्या कार्यप्रणालीवरती प्रश्न चिन्ह निर्माण होत असुन बसस्थानकाजवळ प्रवाशी वर्ग मोठया प्रमाणावर असतो त्यातच महीला वर्गाची संख्या ही मोठ्या प्रमाणात असते येथील तळीरामाचा त्रास महीला प्रवाशी वर्गाला होत असुन अवार्चश्य भाषेत शिवीगाळ करणे रस्तयावरच लघु शंका करणे असे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे या हातभट्टी विक्रीला कुणी लगाम घालेल का? असा देखील प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली एकनाथ शिंदे यांची भेट

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज ठाणे येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. महायुतीचा घटक पक्ष असणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचा विचार करून शिवसेनेच्या कोट्यातील किमान ५ जागा मुंबईत रिपब्लिकन पक्षाला सोडाव्यात यावर चर्चा केली.रिपब्लिकन पक्षाला हव्या असणाऱ्या शिवसेनेच्या कोट्यातील जागांची यादी ना. रामदास आठवले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपुर्द केली.यावर विचार करून काही जागा सोडण्याबाबत प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भेटलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाला दिले.जागावाटाप पूर्ण झाले असून उमेदवारांना ए बी फॉर्म चे ही वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाला जागा सोडण्यात अडचणी असल्या तरी प्रयत्न करणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

यावेळी मुंबई जिल्हा नियोजन समितीमध्ये रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिका-यांना सामावुन घेण्याबाबत मागणी करण्यात आली. तसेच राज्य शानसाच्या विविध शासकिय समित्यांकडे रिपब्लिकन कार्यकर्त्यांचा समावेश करण्याची आग्रही मागणी ना. रामदास आठवले यांनी यावेळी केली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांना डी.पी.डी.सी. व विविध शासकीय समित्यांमध्ये निश्चित सामावुन घेणार असल्याचे आश्वासन रिपाइंच्या शिष्टमंडळाला दिले. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; काकासाहेब खंबाळकर; गौतम सोनवणे सिद्धार्थ कासारे सुरेश बार्शिंग भास्कर वाघमारे एम एस नंदा; साहेबराव सुरवाडे; हेमंत रणपिसे; प्रल्हाद मगरे; आदी मान्यवर उपस्थित होते.

नवापूर बाजार समितीत बकाराम गावितांचा 'रुबाब' कायम; अविश्वास ठराव पुन्हा फसला

दैनिक वादळ वार्ता
नवापूर । मोहसीन शेख

नवापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बकाराम गावित यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव पुन्हा एकदा धूळधाण झाला. १३ सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असूनही विशेष सभेला केवळ दोनच सदस्य उपस्थित राहिल्याने गणपूर्तीअभावी बैठक तहकूब झाली आणि ठराव आपोआप बाद मानण्यात आला.या निकालामुळे गावित यांचे वर्चस्व अबाधित राहिले असून विरोधकांची मोठी नामुष्की झाली आहे. अविश्वास ठराव फसल्याची माहिती मिळताच समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला.

वादळी कट्टा

मोकळं आकाश

जगण्याला कोणाच्या लावू नये बंधन,
पंखही त्याला द्यावेत आंदण

पायातला काटाही करेल वेदनेचं गुंजन,
तरीही स्वतःच शोधावी
स्वतःच्या स्वप्नांकडे जाणारी पांदन

चुकेल कधी निवडताना दिशा,
तरीही मनात जिवंत ठेवावे
विस्तारलेलं अंगण

अपयशालाही झुकून करावं लागतं वंदन,
तेव्हाच लाभतं मस्तकी
अनुभवाचं चंदन

जगण्याला कोणाच्या लावू नये बंधन,
पंखही त्याला द्यावेत आंदण

:: कवी ::
विलास पोवळे

जमीन विकून टाक म्हणून मागासवर्गीय वृद्ध दांपत्यास जीवे मारण्याची धमकी देऊन मारहाण

चौघा विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज

केज तालुक्यात एका गावात एका मागासवर्गीय समाजाच्या वृद्ध पती पत्नी यांना तुमची आमच्या शेजारी असलेली जमीन विकून टाका अन्यथा तुम्हाला जीवे मारून टाकू म्हणून जीवे मारण्याची धमकी देत जातीवाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी चौघा विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील लाडेगाव येथील गणपती सैन्नाप्पा कांबळे वय (७५ वर्षे) यांची लाडेगाव शिवारात गट क्र. १२६ मध्ये २७ गुंठे शेत जमीन आहे.

दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी सांयकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारा ते त्यांच्या शेतातील मोटार चालु करण्यासाठी नंबर बांधाने पायी जात असताना त्यांच्या शेजारी जमीन असलेल्या धनराज नरसु अंबाड, दत्ता ऊर्फ धर्मराज भानुदास शितोळे, प्रदिप संपत्ती अंबाड आणि सुरेखा डिगाबर मुळे या चौघांनी संगणमत करुन गणपती कांबळे यांना जातीवाचक बोलून म्हणाले की, तुझी जमीन विकून टाक. नाहीतर आम्ही तुला व तुझ्या कुटुबाला जीवे मारुन टाकू. अशी धमकी दिली. तर दत्ता ऊर्फ धर्मराज शितोळे यांने त्यांचे हातातील लोखंडी गजाने गणपती कांबळे यांच्या डाव्या हातावर मारुन जखमी केले. प्रदीप अंबाड याने पाठी मागुन डोक्यात लाकडी काठीने मारून मुक्का मार दिला. त्यावेळी गणपती कांबळे यांची पत्नी भामाबाई कांबळे ही भांडण सोडवण्यासाठी आली असता तीला सुरेखा डिंगाबर मुळे हिने डोक्याचे केसाला धरुन खाली पाडले आणि चापटा बुक्याने व लाथाने मारहाण केली.या प्रकरणी गणपती कांबळे यांनी दि. १ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या तक्रारी वरून युसुफवडगाव पोलिस ठाण्यात धनराज अंबाड, दत्ता ऊर्फ धर्मराज शितोळे, प्रदिप अंबाड आणि सुरेखा मुळे या चौघा विरुद्ध गु. र. नं. २/२०२६ नुसार ट्रॉसिटीचे कलम ३(१)(एस), ३(१)(आर), ३(२)(व्ही ए) यासह भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५१, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम हे तपास करीत आहेत.

संपादकीय

विदर्भात युती-आघाडीत रणधुमाळी

विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर या चारही महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारी अर्ज दाखल होताच राजकीय चित्र अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे. युतीच्या घोषणा असल्या, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी आघाड्या तुटल्या, बिघाडी झाली आणि बंडखोरी उफाळून आली. त्यामुळे या निवडणुका केवळ स्थानिक सत्तेसाठी नव्हे, तर सर्वच पक्षांसाठी ताकदीची कसोटी ठरणार आहे.महापालिका निवडणुकांमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत मंगळवारी दुपारी संपली. विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, आणि चंद्रपूर या चारही महापालिकांमध्ये उत्साहात आणि जल्लोषात अर्ज दाखल केले गेले. शक्यतोवर आम्ही युतीतच लढणार असे आधी प्रत्येकच पक्ष म्हणत होता. मात्र विदर्भाच्या चारही महापालिकांमध्ये प्रत्येक ठिकाणी युती किंवा आघाडी आहेच असे चित्र नाही. कुठे कुठे बिघाडी देखील झाल्याचे दिसून आले आहे. नागपुरात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांची जरी युती झाली असली तरी महायुतीतील तिसरा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस हा मात्र स्वतंत्र लढत असल्याचे चित्र आहे. त्याचवेळी महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार गट आणि उबाठा गट हे तीनही वेगवेगळे लढत असल्याचे चित्र दिसत आहे. नागपूर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे शहर आहे. तसेच इथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचेही चांगलेच वजन आहे. त्याचवेळी काँग्रेसमध्ये विकास ठाकरे आणि राष्ट्रवादीतून अनिल देशमुख हे देखील जोर मारताना दिसून येत आहेत.

अमरावती महापालिकेत मात्र महायुतीतील शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षांनी स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले त्याचवेळी परस्परांच्या आडमुठ्या धोरणामुळे युती होऊ शकली नाही असा दोन्ही पक्ष एकमेकांवर आरोप करताना दिसत आहेत. त्याचवेळी महाविकास आघाडीमध्ये मात्र समन्वय दिसत आहे. अर्थात हा समन्वय देखील किती काळ टिकेल याबाबत शंका निर्माण होत आहे. इथे बंडखोरांनी अर्ज मागे घ्यावे यासाठी अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अखेरच्या क्षणापर्यंत धावपळ केली. तसेच राणा दांपत्याच्या युवा स्वाभिमान पक्षाशी देखील तडजोड करता येईल का यासाठीही प्रयत्न केल्याची माहिती आहे. अकोल्यात भाजप आणि शिवसेना यांची युती होऊ शकली नाही, त्याचवेळी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची मात्र युती झालेली दिसते. शिवसेना इथे स्वबळावर लढणार असल्याची माहिती आहे. याशिवाय काँग्रेस आणि शरद पवार गट हे एकत्रितपणे लढणार असून उबाठा गट मात्र स्वतंत्रपणे लढणार आहे. याशिवाय इथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि एमआयएमचे देखील उमेदवार रिंगणात उतरले आहेत. बच्चू कडूंची प्रहार संघटना इथे उबाठा गटाला सहकार्य करणार आहे.चंद्रपूर महापालिकेत शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांची युती झालेली आहे. इथे काँग्रेस आणि उबाठा गट हे स्वतंत्रपणे लढणार असल्याचे चित्र आहे. या चारही महापालिकांमध्ये आधी भाजपचीच सत्ता होती. त्यामुळे यावेळी भाजप-शिवसेना युतीला आपली सत्ता टिकवण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. त्याचवेळी सर्वच पक्षांमध्ये असलेले गोंधळाचे वातावरण हे सर्वांच्याच विजयामध्ये अडथळा आणणारे ठरते की काय असे चित्र दिसत आहे. विशेषतः सत्ताधारी भाजपमध्ये नागपुरात आणि चंद्रपूरमध्ये बरेच गोंधळाचे वातावरण आहे. नागपुरात भाजपमध्ये बंडखोरी होऊ नये म्हणून अखेरच्या क्षणापर्यंत यादीच जाहीर केली नव्हती. आदल्या रात्री एकेका उमेदवाराला कार्यालयात किंवा नेत्याच्या घरी बोलावून एबी फॉर्म दिले जात होते. हे समजताच इच्छुक उमेदवारांनी तिथे गर्दी केली आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक प्रभागांमध्ये बाहेरच्या प्रभागातील उमेदवार दिल्याची तक्रार केली जात आहे. परिणामी भाजपमध्ये अनेक पदाधिकाऱ्यांनी राजीनामे सुद्धा दिले आहेत. आता या सर्व नाराजांना समजावून पक्षकार्यात सक्रिय करणे, तसेच ज्यांनी बंडखोरी केली आहे त्यांनाही समजावणे हे आव्हान भाजप नेतृत्वासमोर राहणार आहे. नागपुरात भाजपने ७० टक्के जुन्या नगरसेवकांना घरी बसवले असून तिथे तरुणाईला संधी दिल्याचे दिसून आले आहे. काँग्रेसने देखील अनेक जुन्या दिग्गजांना घरी बसवले आहे. त्यामुळे आता अनेक नवखे चेहरे महापालिकेत दिसू शकतील असे बोलले जात आहे. चंद्रपूर भाजपमध्ये जुने निष्ठावंत आमदार सुधीर मुनगंटीवार आणि पक्षात नव्याने आलेले आमदार किशोर जोरगेवार यांच्यातच संघर्ष सुरू असल्याचे दिसत आहे. त्याची चुणूक आधी नगर परिषद निवडणुकांमध्येच दिसून आली होती. आता पुन्हा तो संघर्ष सुरूच असल्याचे दिसते आहे. त्यामुळे इथे उमेदवारी वाटपातच बराच गोंधळ झाला होता. परिस्थिती आटोक्यात राहावी म्हणून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी बुलढाण्याचे आमदार चैनसुख संचेती आणि गडचिरोलीचे माजी खासदार अशोक नेते यांना निरीक्षक म्हणून नेमले होते. मात्र या दोघांना देखील परिस्थिती आवरणे कठीण झाले होते असे बोलले गेले. या गोंधळात चंद्रपूर भाजप जिल्हाध्यक्षांनी प्रदेशाकडून आलेल्या यादीत फेरफार करून आपल्या मर्जीतील बारा उमेदवारांना एबी फॉर्म दिले. त्यामुळे देखील तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शेवटी प्रदेशाध्यक्षांनी जिल्हा अध्यक्षांनाच पदावरून हटवल्यावर आता परिस्थिती निवळली असल्याचे बोलले जात आहे. अर्थात त्याचाही प्रचारावर परिणाम होऊ शकतो. अमरावती आणि अकोल्यातही काही परिस्थिती वेगळी नाही. आज अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असताना सर्वच पक्षातील बंडखोरांनी अर्ज मागे घ्यावे यासाठी पक्ष नेतृत्व त्यांची मनधरणी करताना दिसत आहे. त्यात ठिकठिकाणी हाय व्होल्टेज ड्रामा सुरू असल्याचेही दिसून आले आहे. नागपुरात हजारी पहाड परिसरात भाजपच्या एका बंडखोर उमेदवाराने उमेदवारी मागे घेऊ नये यासाठी त्याच्या समर्थकांनी त्याला घरात कोंडून ठेवल्याचेही आढळून आले आहे. या उमेदवाराला समजावण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे निष्ठावंत आमदार परिणय फुके तिथे पोहोचले. मात्र त्यांनाही या उमेदवारापर्यंत पोहोचू दिले जात नसल्याची ही माहिती आहे.आज अर्जमागे घेण्याची मुदत संपल्यावर चारही महापालिकांमध्ये निवडणुकांचे चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर प्रचाराला सुरुवात होईल. प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय मंत्री नितीन गडकरी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक दिग्गज विदर्भ पिंजून काढतील अशी माहिती आहे. हा प्रचार १३ जानेवारीपर्यंत चालणार आहे. तोवर सर्वच उमेदवार आपापल्या प्रभागात फिरून रात्रीचा दिवस करतील आणि आपला विजय निश्चित करण्याचा प्रयत्न करतील. १५ जानेवारीला मतदान आटोपले की १६ जानेवारीला संक्रांतीच्या मुहूर्तावर कोणाला तीळगूळ मिळणार आणि कोणाची पतंग काढली जाणार हे निश्चित होईल.

लाल की केशरी? कोणत्या रंगाचा गाजर शरीरासाठी फायदेशीर?

दैनिक वादळ वार्ता

हिवाळ्यात गाजर जास्त प्रमाणात बाजारात उपलब्ध असतात. हिवाळ्यात लोक गाजराचा रस, गाजराचा हलवा आणि गाजर सॅलड सारख्या पदार्थांचा आस्वाद घेतात. याशिवाय, गाजरांचा वापर विविध मिष्टान्न बनवण्यासाठी देखील केला जातो. गाजर आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. पण बाजारात दोन प्रकारचे गाजर (लाल गाजर आणि नारंगी गाजर) उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत, लोक अनेकदा गोंधळलेले असतात की कोणते गाजर जास्त फायदेशीर आहे? लाल गाजर खाणे चांगले की नारंगी गाजर?तुम्हाला सांगतो की लाल गाजर फक्त हिवाळ्यातच मिळतात. लाल गाजर नोव्हेंबरपासून मिळू लागतात आणि मार्चपर्यंत उपलब्ध असतात. तर, केशरी गाजर वर्षभर सहज उपलब्ध असतात. जर आपण याकडे अशा प्रकारे पाहिले तर दोन्ही गाजर आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

लाल गाजर आरोग्यासाठी खूप चांगले मानले जातात. त्यात बीटा-कॅरोटीन असते, जे डोळ्यांसाठी देखील खूप फायदेशीर असते. लाल गाजर खाल्ल्याने दृष्टी सुधारते. याशिवाय लाल गाजरमध्ये व्हिटॅमिन सी देखील असते, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी, प्रत्येकाने दररोज लाल गाजर खावे.

लाल गाजर खाल्ल्याने चयापचय गतिमान होते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. फायबर समृद्ध असल्याने, लाल गाजर लठ्ठपणा कमी करण्यास मदत करतात. लाल गाजरमध्ये लाइकोपीन असते, जे एक अँटीऑक्सिडंट आहे. या अँटीऑक्सिडंटमुळे गाजरांचा रंग अधिक लाल दिसतो. लाल गाजर हृदयाच्या आरोग्यासाठी देखील अत्यंत फायदेशीर मानले जाते.

केशरी रंगाच्या गाजरांमध्ये बीटा-कॅरोटीन असते, जे शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये रूपांतरित होते. म्हणून, ते डोळ्यांसाठी फायदेशीर मानले जाते. केशरी रंगाच्या गाजरमध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. त्यात व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन ई खूप जास्त प्रमाणात असते.केशरी रंगाचे गाजर खाल्ल्याने हाडे मजबूत होतात आणि त्वचेच्या समस्याही सुधारतात. संत्र्याच्या गाजरांमध्ये पुरेशा प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचा निरोगी ठेवण्यास, मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास आणि वृद्धत्व उलट करण्यास मदत करतात.

बटाट्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो का?

दैनिक वादळ वार्ता

आजच्या काळात मधुमेहाची समस्या खूप वेगाने वाढत आहे. भारतात मधुमेहाचे १०० दशलक्षाहून अधिक रुग्ण आहेत आणि पुढील काही वर्षांत ही संख्या १५ कोटींच्या पुढे जाण्याची अपेक्षा आहे. मधुमेह टाळण्यासाठी, बर्याचदा आहार सुधारण्याची शिफारस केली जाते. मधुमेह टाळण्यासाठी बरेच लोक बटाटे खाणे सोडून देतात. असे मानले जाते की बटाटे खाल्ल्याने मधुमेह होऊ शकतो. आता प्रश्न असा आहे की, बटाटे खाल्ल्याने खरोखरच मधुमेहाचा धोका वाढतो का? याबद्दलचे सत्य डॉक्टरांकडून जाणून घेऊया. बटाट्याचा वापर स्वयंपाकात सर्वाधिक केला जातो आणि तो जवळपास प्रत्येक पाककृतीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. भाजी, पराठा, वडे, चिप्स, फ्रेंच फ्राईज, सांबार, कटलेट, समोसा अशा विविध पदार्थांमध्ये बटाटा वापरला जातो. बटाट्याच्या स्टार्चयुक्त गुणधर्मामुळे तो पोटभरणारा आणि ऊर्जा देणारा असतो. बटाट्याचा वापर स्नॅक्स, मुख्य जेवण, उपवासाच्या पदार्थांमध्येही मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे बटाटा हा भारतीय तसेच जागतिक पाककलेतील एक बहुउपयोगी आणि आवडता खाद्यपदार्थ आहे. आरोग्य तज्ञांच्या मते, बटाटे ही सर्वात जास्त वापरली जाणारी भाजी आहे आणि त्यात फायबर, पोटॅशियम, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन बी ६ सारखे पोषक घटक असतात. बटाट्याचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

आजकाल मधुमेह हा एक गंभीर आजार आहे, ज्याची अनेक कारणे आहेत. एकट्याने बटाटे खाल्ल्याने मधुमेहाचा धोका वाढत नाही. लोकांमध्ये हा गैरसमज आहे आणि तो टाळला पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीला आधीपासूनच मधुमेह असेल तर त्याने बटाट्याचे सेवन मध्यम प्रमाणात केले पाहिजे. डॉक्टरांनी सांगितले की बटाट्यांमध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असते, जे शरीरात

जाते आणि ग्लुकोजमध्ये रूपांतरित होते. हेच कारण आहे की बटाटे उच्च ग्लाइसेमिक इंडेक्स (जीआय) अन्न मानले जातात. उच्च ग्लाइसेमिक इंडेक्स असलेले पदार्थ खाल्ल्याने मधुमेहाच्या रुग्णांची रक्तातील साखर वेगाने वाढू शकते. जर बटाटे मोठ्या प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने खाल्ले गेले तर त्याचा परिणाम मधुमेहाच्या रुग्णांच्या रक्तातील साखरेवर होऊ शकतो. तथापि, निरोगी लोकांसाठी बटाटे खाणे सुरक्षित आहे आणि मधुमेहाचा धोका नाही. तज्ज्ञांनी सांगितले की, जर बटाटे प्रथिने आणि फायबर समृद्ध असलेल्या पदार्थांसह खाल्ले तर त्याचा परिणाम हळूहळू होतो. उदाहरणार्थ, दही, भाज्या किंवा मसूर सोबत बटाटे खाल्ल्याने अचानक रक्तातील साखर वाढत नाही. याशिवाय बटाटे थंड खाल्ल्याने त्यातील प्रतिरोधक स्टार्च वाढतो, ज्यामुळे साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. बटाटे आहारातून पूर्णपणे काढून टाकण्याची आवश्यकता नाही, परंतु शहाणपणाने सेवन केले पाहिजे. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि रक्तातील साखरेचे निरीक्षण करून बटाटे खाल्ले तर ते आरोग्यासाठी हानिकारक नाही. बटाटा हा पोषक तत्त्वांनी समृद्ध आणि सहज उपलब्ध असलेला खाद्यपदार्थ आहे. त्यामध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण जास्त असल्याने तो शरीराला त्वरित ऊर्जा प्रदान करतो. बटाट्यामध्ये व्हिटॅमिन उ, व्हिटॅमिन इ६, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फायबर तसेच अँटिऑक्सिडंट्स आढळतात. हे पोषक तत्त्व रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास, पेशींचे संरक्षण करण्यास आणि त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. उकडलेला किंवा भाजलेला बटाटा खाल्ल्यास पचन सुधारते आणि पोटाशी संबंधित त्रास कमी होतो. बटाट्यातील पोटॅशियम हृदयाचे आरोग्य जपण्यास, रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. तसेच फायबरच्या उपस्थितीमुळे बद्धकोष्ठतेपासूनही आराम मिळतो.बटाट्यामध्ये फॅट आणि कोलेस्ट्रॉल नसल्यामुळे तो योग्य प्रमाणात खाल्ल्यास वजनातील संतुलन राखण्यास मदत करतो. व्यायाम करणारे किंवा शारीरिक श्रम करणारे लोकांसाठी बटाटा उत्तम ऊर्जा स्रोत मानला जातो. तसेच बटाट्यातील अँटिऑक्सिडंट्स शरीरातील ताण कमी करण्यास सहाय्य करतात. बटाट्याचे रसातीत गुणधर्म त्वचेवरील डाग, सूज कमी करण्यास मदत करतात, त्यामुळे तो सौंदर्यवर्धक उपयोगासाठीही फायदेशीर ठरतो. मात्र, हे सर्व फायदे मिळविण्यासाठी बटाटा तळलेल्या स्वरूपात न खाता उकडून, वाफवून किंवा भाजून खाणे अधिक चांगले. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने सेवन केल्यास बटाटा हा आरोग्यासाठी लाभदायक आणि पौष्टिक आहाराचा एक महत्त्वाचा घटक आहे.

अयोध्याप्रमाणे अहिल्यानगरमध्ये श्रीराम लल्ला प्रतिष्ठा द्वादशी उत्सव मोठ्या भक्तिभावात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

अयोध्येतील प्रभू श्रीराम लल्ला प्राणप्रतिष्ठेच्या तिथीनुसार श्रीराम लल्ला प्रतिष्ठा द्वादशी यावर्षी ३१ डिसेंबर २०२५ रोजी अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती भागातील नवी पेठ येथील पुरातन श्रीराम मंदिरात अयोध्याप्रमाणेच मोठ्या उत्साहात, भक्तिभावात व धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट, श्रीराम मंदिर नवी पेठ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले २० ते ३१ डिसेंबरदरम्यानचे ११ दिवसीय धार्मिक कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, शांततापूर्ण आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागात यशस्वीरीत्या संपन्न झाले.

या निमित्ताने मंदिर परिसरात आकर्षक बंगाली मंडप, विद्युत रोषणाई, फुलांची सजावट करण्यात आली होती. संपूर्ण नवी पेठ परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. या उत्सवाची सुरुवात शनिवार, दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी श्रीराम जय राम जय जय राम या अखंड संगीतमय नामजपाने करण्यात आली. तब्बल १२ हजारांहून अधिक भाविकांनी या नामजपात सहभाग घेतला. रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी नगर शहरातून ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात भव्य ग्रंथ व कलश शोभायात्रा काढण्यात आली. भगव्या पताका, पारंपरिक वेशभूषा आणि जयघोषांमुळे संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणाने भारावून गेले होते. यानंतर श्रीराम मंदिर, नवी पेठ येथे परमपूज्य रामायणाचार्य गोरक्षनाथ महाराज यांच्या सुमधुर व प्रभावी वाणीतून ११ दिवसीय श्रीरामचरितमानस कथेला विधिवत प्रारंभ झाला. २१ ते २९ डिसेंबरदरम्यान दररोज रात्री कथा, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीरामचरितमानस ही जीवनाला दिशा देणारी ग्रंथरचना असून प्रभू श्रीरामांचे आदर्श आचरण आत्मसात केल्यास समाजात सद्भावना व संयम वृद्धिंगत होतो, असे विचार महाराजांनी कथेदरम्यान व्यक्त केले. सोमवार, दिनांक ३० डिसेंबर रोजी पुणे निवासी परमपूज्य स्वामी श्री गोविंद देव गुरुजी महाराजांचे कृपापात्र शिष्य पं. गिरीराजजी व्यास यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय सुंदरकांड संपन्न झाले. मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर रोजी प्रतिष्ठा द्वादशीच्या मुख्य दिवशी पहाटे प्रभू श्रीराम लल्लांचा जलाभिषेक व दुग्धाभिषेक, मंगल आरती, शृंगार दर्शन, तसेच 'एक सुबह प्रभू श्रीराम के नाम' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अयोध्येत ज्या वेळी प्रभू श्रीराम लल्लांची आरती झाली, त्याच वेळी श्रीराम मंदिर नवी पेठ येथेही महाआरती करण्यात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष श्री प्रीतम मुथा यांनी सांगितले की, प्रभू श्रीरामांचे चरित्र प्रत्येकाच्या जीवनात उतरावे आणि तरुण पिढीत संस्कार रुजावेत, हा या उत्सवामागील मुख्य उद्देश आहे. उपाध्यक्ष श्री निखिल शेटीया यांनी नगरकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त करत, असे धार्मिक उपक्रम समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. नवी पेठेतील सुमारे तीनशे वर्षांहून अधिक प्राचीन असलेले श्रीराम मंदिर हे शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे एक महत्त्वाचे केंद्र असून, या प्रतिष्ठा द्वादशी उत्सवामुळे नगरकरांना एक अविस्मरणीय आध्यात्मिक अनुभव लाभला. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, सेवेकरी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. या ११ दिवसीय उत्सवाच्या माध्यमातून संपूर्ण अहिल्यानगर शहरात भक्ती, श्रद्धा व अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून, श्रीराम लल्ला प्रतिष्ठा द्वादशी उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावात संपन्न झाल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. वर्षभर दर शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेस महाहनुमान चालिसा पाठ भजन संध्या व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते, या कार्यक्रमाचा सर्व शहरवासीयांनी लाभ घ्यावा.

लग्नाचे आमिष दाखवून विधवेवर बलात्कार;इंस्टाग्रामवर झाली होती ओळख

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज

दोन मुलाची आई असलेल्या विधवेची सोशल मीडियावर एक तरुणाशी ओळख झाली. त्या नंतर त्या दोघात प्रेमसंबंध प्रस्थापित झाले. त्याने तिला तिच्या सोबत लग्न करण्याचे आमिष दाखवून वारंवार सहमतीने शारीरिक संबंध प्रस्थापित करून एके दिवशी त्याने तिच्या इच्छे विरुद्ध घरात घुसून बळजबरीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची खळबळजनक घटना घडली आहे.केज तालुक्यात एका गावात एका तरुणीचे तेरा वर्षा पूर्वी गावातील एका तरुणाशी लग्न झाले होते. लग्ना नंतर त्यांना दोन अपत्ये झाली. दरम्यान त्या महिलेच्या पतीचे सात वर्षा पूर्वी एका अपघातात मृत्यू झाला. त्या नंतर ती विधवा महिला ही तिच्या दोन मुलांना घेऊन केज तालुक्यातही तिच्या सासरी मोलमजुरी करून कुटुंबाची उपजीविका भागवीत होती. दोन वर्षा पूर्वी तिची गावातील रमाकांत तांदळे या एका ३० वर्षीय अविवाहित तरुणाशी इन्स्टाग्रामवर ओळख झाली. त्या ओळखीतून त्यांच्यात प्रेमसबंध निर्माण झाले. ती विधवा महिला ही एकटी व असहाय्य असल्याने रमाकांत तांदळे तिला तीच्याशी लग्न करण्याच्या आमिषाने वेळोवेळी फसवणूक करून सहमतीने तिच्या सोबत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

दरम्यान शारीरिक संबंध निर्माण करून तिचे लैंगिक शोषण केलेल्या त्या विधवा महिलेला अंधारात ठेवून; रमाकांत तांदळे याने १४ ऑगस्ट २०२५ रोजी अन्य दुसऱ्या तरुणीशी गुपचूप विवाह केला. त्याचे लग्न झाल्या नंतर सुद्धा त्याने दि. ३१ डिसेंबर रोजी ती विधवा महिला घरात एकटी असताना घरात घुसून तिच्याकडे शरीर सुखाची मागणी केली. तिने नकार देताच त्याने बळजबरीने आणि तिच्या इच्छेविरुद्ध तिच्या सोबत लैंगिक अत्याचार करून अनैतिक असे सबंध प्रस्थापित केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली.या प्रकरणी अत्याचारित विधवेने केज पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून रमाकांत तांदळे याच्या विरुद्ध लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध ठेवले. तसेच घरात घुसून इच्छे विरुद्ध बळजबरीने लैंगिक अत्याचार करून जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून त्याच्या विरुद्ध गु. र. नं. ६/२०२६ भा. न्या. सं. ६४(१), ११५(२), ३३३, ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत.

घटनाक्रम :-
२०१२ मध्ये लग्न
२०१८ मध्ये विवाहितेच्या पतीचे अपघातात निधन
२०२३ मध्ये इंस्टाग्रामवर विधवेची तरुणा सोबत ओळख व त्या नंतर लग्नाचे आमिष दाखवून सहमतीने शारीरिक संबंध
ऑगस्ट २०२५ रोजी तिला फसवून त्याने दुसऱ्या तरुणीशी लग्न केले
३१ डिसेंबर २०२५ रोजी घरात घुसून बळजबरीने तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध
१ जानेवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल

-आरोपी फरार :-या लैंगिक प्रकरणातील आरोपी फरार असून पोलिस आरोपीला जेरबंद करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

मुगांव येथे ५ जानेवारी रोजी मोफत आरोग्य शिबिर-अवकाश पाटील धुपेकर

दैनिक वादळ वार्ता
नायगाव । हनुमंत चंदनकर

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य विमा योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत नायगाव तालुक्यातील मुगांव येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांची मोफत तपासणी तसेच विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय सल्ला देण्यात येणार आहे.तरी मोठ्या संख्येने उपस्थित लाभ घ्यावा असे आवाहन अवकाश पाटील धुपेकर यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये हृदयरोग, किडनी विकार, मधुमेह, कर्करोग, थायरॉईड, रक्तदाब तसेच इतर गंभीर आजारांवरील उपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून सदर शिबिरात डॉ. निलेश बास्टेवाड साहेब यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार असून, रुग्णांची तपासणी करून आवश्यक त्या उपचारांची माहिती देण्यात येईल.

हे मोफत आरोग्य शिबिर दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय, मुगांव येथे आयोजित करण्यात आले असून नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अवकाश पाटील धुपेकर यांनी कळविले आहे.

खडकमांजरी येथे सावित्रीबाई फुले जयंती 'बालिका दिन' म्हणून उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
लोहा । राजकुमार पिल्लोळे

लोहा तालुक्यातील खडकमांजरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि. ३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती 'बालिका दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. श्रीराम कलणे होते, तर मार्गदर्शक म्हणून श्री. हिरामण मोरे आणि श्री. ज्ञानेश्वर पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. विद्यार्थ्यांनी गीतगायन, भाषण आणि मनोगतांद्वारे त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. ओरुषी, संध्या, सोनी, विवेक, माधव आणि चैतन्य या विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषण करून टाळ्यांची दाद मिळवली. मार्गदर्शनपर भाषणात सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समानता आणि अंधश्रद्धेविरुद्ध दिलेला लढा याची माहिती शिक्षकांनी दिली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना शिक्षणातून प्रगती साधत आदर्श नागरिक होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर पवार यांनी, तर आभार प्रदर्शन श्री. हिरामण मोरे यांनी केले. कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

भिमाई निवास शिक्षक कॉलनी, केज येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

भिमाई निवास शिक्षक कॉलनी, केज येथे दि. ३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहपूर्वक साजरी करण्यात आली. महिलांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमास महानंदा गायकवाड, प्रमिला मस्के, कौशल्या मस्के, लता भडके, जया वाघमारे, शीतल मस्के, पार्वती खंदारे, प्रतीक्षा गायकवाड, उषा मस्के आणि सिरसटबाई आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पौष महिन्यानिमित्त वंदना घेऊन खिरदान करण्यात आले तसेच शरणतेय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमादरम्यान सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे स्मरण करून शिक्षण, स्त्रीसक्षमीकरण व सामाजिक समतेचा संदेश देण्यात आला.

तालुकास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेत जि.प.प्रा.शा.आनंदगावचे घवघवीत यश

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज येथे जि.प.बीड शिक्षण विभाग अंतर्गत झालेल्या तालुकास्तरीय वैयक्तिक क्रीडा प्रकारात जि.प.प्रा.शा.आनंदगांव ,केंद्र पैठण येथील विद्यार्थीनीं अनुष्का भोगजकर धावणे या क्रीडा प्रकारात तालुक्यातुन प्रथम,सांघिक क्रीडा प्रकारात लंगडी मुले लहान गटातुन याच शाळेतील विद्यार्थ्यांचा संघ केज तालुक्यातुन प्रथम आला आहे.

तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समुह नृत्य स्पर्धेत लहान गट मुले जि.प.प्रा.शा.आनंदगांव तालुक्यातुन प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. या यशाबद्दल तालुक्याचे गट शिक्षण अधिकारी सुनिल केंद्रे, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती पठाण ,केंद्र प्रमुख अण्णासाहेब जाधव , विषयसाधनव्यक्ती शेख नयूम, केंद्रीय मुख्याध्यापक गोविंद मुळे मुख्याध्यापिका वृषाली आचार्य,सहशिक्षिका एम यु देशमुख,परदेशी एन,ए, आयवळे कुणाल, सरपंच अंजना गायकवाड ,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गायकवाड , माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष डॉ हनुमंत सौदागर , यांच्यासह ग्रा प सदस्य यासह या शाळेतील विद्यार्थ्यांना जि.प.प्रा.शा.आनंदगावच्या मुख्याध्यापिका वृषाली आचार्य,मंगल देशमुख,निता परदेशी,कुणाल आयवळे यांचे मोलाचे मार्गदर्शन करून ग्रामीण भागातून शाळेला घवघवीत यश प्राप्त करून दिले याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

उरण तालुक्यातील अटक करण्यात आलेल्या ३० पारंपारिक मच्छिमार कुटुंबातील मच्छिमारांना मुंबई उच्च न्यायालयाचा दिलासा

दैनिक वादळ वार्ता
उरण । प्रतिनिधी

उरण तालुक्यातील अटक करण्यात आलेल्या ३० पारंपारिक मच्छिमार कुटुंबातील मच्छिमारांना माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार मोठा दिलासा दिला आहे.

फेब्रुवारी २०२३ साली उरण तालुक्यातील उरण बायपास रस्ता हा पारंपारिक मच्छिमार क्षेत्रातून व मोठ्या प्रमाणावर कांदळवन तोड करून बनविण्यासाठी सिडकोच्या माध्यमातून प्रयत्न सुरू होते त्यास स्थानिक पारंपारिक मच्छिमार समाजाने प्रखर विरोध दर्शविला होता कारण हा प्रश्न मच्छिमारांच्या संवैधानिक हक्काच्या रोजगार व पर्यावरण हानी या संवेदनशील मुद्द्या संदर्भात होता व स्थानिक पारंपारिक मच्छिमार समाज्याच्या मच्छिमार नौका जाण्याच्या मार्गावरच सिडकोने तो प्रस्तावित केलेला होता आणि या विरोधात मार्च २०२३ साली या प्रकल्पास विरोध करीत आंदोलन करण्यात आले होते. सिडकोच्या प्रभावामुळे पोलिसांनी कारवाई करीत ३० पारंपारिक मच्छिमारांना अटक केली. ३० मच्छिमारांपैकी १० महिला मच्छिमार भगिनी होत्या व २० पुरुष मच्छिमार होते व त्यांना तळोजा कारागृहात व महिलांना कल्याण येथील आधारवाडी कारागृहात कलम ३५३ अंतर्गत सुमारे १२ दिवस डांबून ठेवण्यात आले होते. १२ दिवसानी पनवेल दिवाणी न्यायालयात जामिन अर्ज दाखल करण्यात आला होता.त्यात मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ऍड. मोहम्मद अबदी यानी प्रभावीपणे बाजू मांडली आणि जमीन मंजूर करण्यात आला. त्यानंतर, मुंबई उच्च न्यायालयात गुन्हा रद्द करण्याबाबत याचिका (थीळीं झशींळींळेप पे. ६१० ेष २०२३) दाखल करण्यात आली. त्यावर दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी सुनावणी होऊन त्यादरम्यान उच्च न्यायालयाने अत्यंत कठोर शब्दात या प्रकरणी सिडको प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांना खडेबोल सुनावले, कलम ३५३ हे मच्छिमारांना लावल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली त्याचबरोबर मच्छिमारांना अटक करू नये आणि कुठल्याही प्रकारे आरोपपत्र दाखल करू नये असे आदेश पारित केले. वरीष्ठ वकील मिहीर देसाई यांनी न्यायालयात मच्छिमारांची प्रभावीपणे बाजू मांडली.त्यानंतर, दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी झाली त्याअनुषंगाने कायदेशीर प्रक्रियेचा एक भाग म्हणून आरोपपत्र दाखल करण्याचे आदेश देण्यात आले परंतु, भविष्यात कुठल्याही प्रकारे मच्छिमारांवर फौजदार कारवाई करण्यात येऊ नये असे सक्त आदेश देण्यात आले. सिडको देखील त्यांना सदर प्रकरणी पुढे वाद वाढवायचा नाही असे प्रतिज्ञापत्र माननीय न्यायालयात सादर केले आहे. तसेच न्यायालयाने हे देखील अधोरेखित केले आहे की, मच्छिमारांच्या नुकसानभरपाई संदर्भात याचिका (civil writ petition no. 6911 of २०२२ मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

भद्रावतीच्या बालकवींनी गाजविले नागपूरचे साहित्य संमेलन

मयंक दर्वे, जय गोचे आणि भीमांशी ठमके यांचा बहारदार काव्याविष्कार

दैनिक वादळ वार्ता
नागपूर । प्रतिनिधी

महात्मा फुले शिक्षण संस्था सभागृहात २७ व २८ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या दुसऱ्या अक्षर साहित्य संमेलनात भद्रावतीच्या बालकवींनी आपली काव्यप्रतिभा सादर करून रसिकांची मने जिंकली. महाराष्ट्र भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या सहकार्याने, कला गौरव संस्था, नागपूर, अक्षर क्रांती फाउंडेशन आणि राम गणेश गडकरी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन आयोजित करण्यात आले होते.या संमेलनातील बालकवी संमेलनात भद्रावतीचे मयंक अजय दर्वे, जय दिनेश गोचे आणि भीमांशी विनोद ठमके तसेच ब्रह्मपुरीचे भूपेश निकुरे यांनी बहारदार कविता सादर करून रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविला. बालकवींनी आपल्या सादरीकरणातून उपस्थित साहित्यिकांना मंत्रमुग्ध केले आणि विविध साहित्यिक वस्तूंसह स्मृतीचिन्हांची लयलूट केली.

भद्रावतीचे हे तिन्ही बालक या संमेलनातील सर्वात लहान कवी म्हणून विशेष लक्षवेधी ठरले. त्यांना बालसाहित्यिक शालिक दानव सर यांचे मार्गदर्शन लाभले. या बालकवी संमेलनाचे अध्यक्षस्थानी ड. नीता कचवे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मंदा नांदुरकर व रवींद्र जवादे उपस्थित होते. सूत्रसंचालन राहुल गवस यांनी केले, तर आभार प्रदर्शन मयुरी वाहने यांनी मानले.

बालकवींनी आपल्या यशाचे श्रेय शालिक दानव सर तसेच आई-वडीलांना दिले. या तिन्ही बालसाहित्यिकांचे झाडीबोली साहित्य मंडळ, शाखा भद्रावती आणि बालकुमार फन अँड लर्न संस्कार शिबिर तर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

आळजापूरच्या शाळेमध्ये माजी विद्यार्थी संघाची स्थापना,मच्छिंद्र रोडे अध्यक्ष म्हणून निवड

दैनिक वादळ वार्ता
सोलापूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आळजापूर येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली आहे. या संघाच्या अध्यक्षपदी मच्छिंद्र रोडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य मोलाचे ठरणार आहे, या उद्देशाने ही संघटना निर्माण करण्यात आली. संघाच्या उपाध्यक्षपदी शरद रोडे यांना बिनविरोध निवडले गेले. सचिन रोडे, सोमनाथ शेवाळे, विनोद नवले, प्रदीप भालेराव, अनुसया मोटे, ज्ञानदेव कुंभार, दत्तात्रय टेंबाळे, सुग्रीव भंडारे, रूपाली आखाडे, दादासाहेब वाकळे, प्रभाकर काळे, युवराज रोडे, सोमनाथ केवारे, दादासाहेब रोडे यांना संघाच्या सदस्य म्हणून निवडण्यात आले.समारंभाच्या निमित्ताने शाळेच्या विकासासाठी मच्छिंद्र रोडे, शरद रोडे, सुरेश गपाट, विनोद नवले व दत्तात्रय टेंबाळे यांनी देणगी स्वरूपात आर्थिक सहाय्य केले. शाळा व्यवस्थापन समितीने व शाळेच्या वतीने या दानशूरांचे आभार मानले.

यावेळी माजी सरपंच युवराज गपाट, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत घोडके, पोलीस पाटील विश्वंभर रोडे, उपाध्यक्ष समाधान रणसिंग, दादासाहेब केवारे, भाऊसाहेब लक्ष्मण रोडे, दिनेश रोडे, फुलचंद गपाट, सुरेश गपाट, अरुण रोडे, अशोक रोडे, आत्माराम मोरे, संदीप गपाट इत्यादी गणमान्य व्यक्ती उपस्थित होत्या. आत्मीय व आनंददायी वातावरणात ही निवड प्रक्रिया संपन्न झाली. नव्याने स्थापन झालेला हा संघ शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी व सर्वांगीण उन्नतीसाठी कार्यरत राहील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

इन्फंट इंडिया सोबत जागवल्या कलाकथीत आशाबाई बचुटे यांच्या स्मृती

दिवंगत आशाबाई बचुटे आदर्श माता

आपल्या दोन्ही मुलांना वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या आणि सर्व कुटुंबांना माया आणि प्रेमाच्या धाग्याने जोडणाऱ्या कालकथीत आशाबाई बचुटे या आदर्श माता म्हणून त्यांचा अभिमान आहे. तर मागील आठ वर्षा पासून त्यांची वैद्यकीय व्यवसायातील त्यांची दोन्ही मुले घेत असलेल्या मोफत आरोग्य शिबिर हे प्रेरणादायी आणि गोरगरिबांची सेवा करण्याचा घेतलेला वसा आहेत. तर त्यांचे सर्व कुटुंब हे एक आदर्श कुटुंब आहे.

–दत्ता भाऊ बारगजे, इन्फंट इंडिया

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज

आपल्या दिवंगत मातोश्रीच्या स्मृती दिन हा आनंद ग्राम मधील अनाथ मुलांच्या सोबत घालवून त्यांच्या सोबत एकत्र भोजन करून डॉ. आकाश बचुटे, डॉ विवेक बचुटे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या मातोश्रीसह इन्फंट मधील सर्व अनाथांचा आई संध्याताई बारगजे यांचे वडील गणपती (दादा) चाटे यांना श्रध्दांजली अर्पण केली. प्रसिद्ध कान नाक घसा तज्ज्ञ डॉ. आकाश बचुटे, दंत चिकित्सक डी. विवेक बचुटे यांच्या मातोश्रीच्या पुण्यस्मरण दिना निमित्त बचुटे कुटुंबियांनी सौ. संध्याताई बारगजे आणि दत्ता बारगजे यांच्या पाली येथील एच आय व्ही बाधितांसाठी चालवित असलेल्या आनंदग्राम येथील इन्फंट इंडियाच्या अनाथ विद्यार्थ्या सोबत सर्व सर्वांनी एकत्रित जेवण करून आईला श्रद्धांजली अर्पण केली.

तसेच इन्फंट मधील अनाथांच्या आई सौ. संध्याताई बारगजे यांचे वडील आणि दत्ता बारगजे यांचे सासरे गणपती (दादा) चाटे यांचे दि.२४ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाल्या नंतर चाटे आणि बारगजे कुटुंबियांनी त्यांचे पार्थिव स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात देहदान केले. वैद्यकीय क्षेत्रातील निष्णात डॉक्टर यांना शिक्षण घेता यावे या उदात्त हेतून त्याने केलेले कार्य हे समाजाला दिशा दर्शक आहे.या वेळी त्यांच्या कुटुंबातील सेवानिवृत्त ऑनररी कॅप्टन रावसाहेब बचुटे, गौतम बचुटे, अशोक बचुटे, सौ. संगीता बचुटे, सौ दीक्षा बचुटे, रितेश बचुटे, कु. खुशी, कु. आशू

आभाळाला गवसणी घालणारे कार्य

अनेक दिवसा पासून सौ. दत्ता बारगजे आणि संध्या बारगजे यांचे कार्य हे माहीत होते. परंतु प्रत्यक्ष भेट दिल्या नंतर येथील विद्यार्थी आणि त्यांचे संगोपन याची माहिती घेता आली. तसेच चाटे आणि बारगजे परिवार यांची दिवंगत नामदेव चाटे यांचे मरणोत्तर कोणतेही संस्कार न करता केलेले देहदान हे त्यांचे विचार आणि प्रत्यक्ष कृती याची जाणीव देणारे होते.

– रावसाहेब बचुटे, ऑनररी कॅप्टन (से. नि.)

तळोदा तालुक्यात काळाचा घाला: भरधाव दुचाकीच्या अपघातात पिता-पुत्राचा मृत्यू

दैनिक वादळ वार्ता
नंदूरबार । दिपक गोसावी

नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा परिसरातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. रेवानगर ते तळोदा रस्त्यावर दुचाकीचा भीषण अपघात होऊन ३२ वर्षीय तरुण आणि त्याच्या ७ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रेवानगर येथील रहिवासी कालुसिंग जामसिंग पावरा (वय ३२) हे त्यांचे सात वर्षांचे पुत्र आर्यन कालुसिंग पावरा याच्यासह १ जानेवारीच्या रात्री घराचे बांधकाम पाहून शेताकडे परतत होते. रात्री ९ वाजेच्या सुमारास रेवानगर ते तळोदा रोडवर मेरसिंग जाला पावरा यांच्या शेतासमोर त्यांच्या होंडा शाईन दुचाकीला (क्रमांक. MH 06 AY 9510) भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीवरील दोघांच्याही डोक्याला, तोंडाला आणि हातापायाला गंभीर दुखापत झाली. अपघात रात्रीच्या वेळी झाल्यामुळे आणि रस्ता निर्मनुष्य असल्याने मदत मिळण्यास उशीर झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. २ जानेवारीच्या सकाळी ही घटना उघडकीस आली. या अपघातात कालुसिंग पावरा आणि त्यांचा चिमुरडा मुलगा आर्यन या दोघांचाही जागीच मृत्यू झाला.या प्रकरणी मृताचे नातेवाईक रतन जामसिंग पावरा यांनी तळोदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मयत चालक कालुसिंग याने दुचाकी भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून स्वतःच्या आणि मुलाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(अ), ३२४(४) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश साळी हे करत आहेत.

शेठ के.डी.हायस्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त वक्तृत्व व निबंध स्पर्धा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
नंदूरबार । दिपक गोसावी

पी.ई. सोसायटी संचलित शेठ के.डी. हायस्कूल, तळोदा येथे दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक जे.एल. सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी वक्तृत्व आणि निबंध स्पर्धांच्या माध्यमातून सावित्रीबाईंच्या कार्याला अभिवादन केले.

प्रतिमा पूजन व सांस्कृतिक कार्यक्रम

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक पी.पी. पाटील होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पी.एम. वानखेडे यांनी प्रास्ताविक

केले. जे.आय. राणे यांनी सूत्रसंचालन करतानाच सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित एकपात्री नाटक सादर केले, ज्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

यावेळी कु. कल्याणी वानखेडे आणि कु. अर्चना वळवी या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. जयंतीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत कु. कृती देवरे, रिद्धी ठाकरे आणि सविता पावरा यांनी यश संपादन केले. यशस्वी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

शिक्षक मनोगत व्यक्त करताना आर.एन. कोकणी आणि आर.आर. पाडवी यांनी सावित्रीबाईंच्या संघर्षाचा प्रवास उलगडला. अध्यक्षीय भाषणात पर्यवेक्षक पी.पी. पाटील यांनी आवाहन केले की, विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा पुढे नेऊन त्यांच्या कार्यातून शैक्षणिक प्रगतीची प्रेरणा घ्यावी.

या प्रसंगी उपमुख्याध्यापक जे.एन. माळी यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन आर.आय. चव्हाण यांनी केले. सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या संपूर्ण चमूने परिश्रम घेतले.

परळी शहरातील मुलभूत सेवासुविधा प्राधान्याने सोडवाव्यात अगोदर अर्धवट कामे प्रधान्याने चालू करा-दीपक देशमुख

दैनिक वादळ वार्ता
परळी । प्रतिनिधी

गेली ९ वर्षा पासुन सामान्य परळीकर, अर्धवट विकास कामामुळे त्रस्त आहेत, अर्धवट अंडरग्राउंड ड्रेनेज पाईपलाईन, अर्धवट पाणीपुरवठा योजना, अर्धवट नटराज रंगमंदिर बांधकाम करणे, बरकत नगर येथील मुस्लिम समाज विद्यार्थ्यांचे वस्तीग्रह चालू करणे, अग्निशामन दलाचे सुनियोजित स्टॅन्ड उभारणे,डॉ.भालचंद्र वाचनालय अर्धवट बांधकाम करणे, बौद्ध समाज मंदिर बांधकाम अर्धवट आहे ते पूर्ण करणे , शादी खाण्याचा विकास, तीर्थक्षेत्र विकास योजनेची अर्धवट कामे त्याचबरोबर स्वच्छता-वीज-पाणी या मुलभूतभूत सेवासुविधा पासुन वंचित राहिला असुन सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असलेल्या स्वच्छता-वीज आणि पाणी याचा नियोजन पुर्ण कृती आराखडा तयार करुन. चार किंवा आठ दिवसाला वेळापत्रका नुसार स्वच्छ व मुबलक पाणी, मुख रस्त्यासह वस्ती तेथे लाईट, विकासाच्या नावाखाली उखडून ठेवलेले रस्ते, तात्काळ दुरुस्ती किंवा

प्रत्यारोपण. प्रत्येक प्रभागात स्वतंत्र घंटागाडी घर तेथे घंटागाडी पोहचली पाहिजे . नागरी वस्त्यात सकाळी तर बाजारपेठेत सकाळ संध्याकाळ नियमित आली पाहिजे. या मुलभूत सेवासुविधासह रस्ते नाल्यांची साफसफाई तसेच ओपन स्पेस स्वच्छता करुन कचरा टाकण्यास निर्बध लादणे.या कामाना प्राधान्यक्रम देऊन नगरपालिका प्रशासनाने व नवीन नगराध्यक्षांनी आदर्श पायंडा पाडत सर्वसामान्य परळीकरांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवावा. व खुर्चीवर बसल्यापासून या कामांना प्राधान्य द्यावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. नवीन नगराध्यक्षांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्या दिवसापासूनच परळीच्या सर्वसामान्य लोकांच्या विकास कामाची अर्धवट कामाची यादी निवेदनातून देऊन सर्वसामान्य परळीकरांसाठी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे दीपक देशमुख यांनी निवेदन देऊन नगरपालिकेतील सत्तेत असलेल्या सत्ताधाऱ्यांना व प्रशासनाला पहिल्या दिवसापासून जाणीव करून द्यायला सुरुवात केली आहे.

चौसाळा येथील गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चौसाळा ता.जि.बीड या शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सावित्रीबाई व जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.शाळेतील मुला मुलींनी सावित्रीबाई फुले व जिजाऊ यांच्या सामाजिक कार्यवर व त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल उत्स्फूर्त अशी भाषणे केली.त्यानंतर शाळेतील शिक्षक श्री घोडके सर,होंडे सर,गुरव सर, लिमकर सर,साबणे मॅडम,जाधव मॅडम,यांनी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या सामाजिक कार्यवर आधारित विद्यार्थींना माहिती दिली.आपल्या अध्यक्षीय भाषणात शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री.चौधरी सर यांनी थोर पुरुषांच्या जयंत्या या केवळ औपचारिक

म्हणून साजरी न करता त्यांनी केलेले सामाजिक कार्य व त्यांच्या विचारांचे पाईक होवून ते नितांत आत्मसात करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन श्री.मोटे सर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेचे कर्मचारी श्री बाळासाहेब जाधव सर, टाचतोडे बाई, विश्वनाथ पवार, सोनवणे नाना, धनंजय वाघमारे, विनायक तांदळे,इंद्रजित भोसले

यांनी परिश्रम घेतले शेवटी पसायदान ने कार्यक्रमाची सांगता झाली

इंग्लिश स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

पवनराजे इंग्लिश स्कूल, केज येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य अशोक मस्के हे होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून डॉ. अजय कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रामेश्वर घुले, चौरे मॅडम व पठाण सर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित वेषभूषा साकारून कार्यक्रमाची शोभा वाढवली.सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सावित्रीबाई फुले यांच्या स्त्रीशिक्षणासाठीच्या योगदानावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी वेताळ मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक प्रमुख अश्विनी दळवे मॅडम यांनी मानले. सदर कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

वडाळी येथे चोरी रोखण्यासाठी रात्री सुरक्षा रक्षक नेमण्याचा निर्णय

दैनिक वादळ वार्ता
वडाळी । लाला चव्हाण

वडाळी गावातील वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत रात्री गस्तीसाठी सुरक्षा रक्षक नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीस सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र बागुल उपस्थित होते.

दोन सुरक्षा रक्षकांचा खर्च ग्रामपंचायतीकडून तर दोन रक्षकांचा खर्च व्यापारी बांधवांकडून उचलण्यात येणार आहे. यासाठी व्यापाऱ्यांकडून पाच महिन्यांसाठी प्रत्येकी ५०० वर्गणी ठरविण्यात आली. काही व्यापाऱ्यांनी तत्काळ वर्गणी जमा केली असून उर्वरितांनी दोन दिवसांत जमा करण्याचे आवाहन करण्यात आले.

पुढील दोन दिवसांत सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करून गस्त सुरू करण्यात येणार असून या निर्णयामुळे गावाच्या सुरक्षिततेस बळ मिळणार असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले.

काठी-चापडाफळी शाळांच्या जीर्ण वर्गखोल्यांचा प्रश्न गंभीर!

दैनिक वादळ वार्ता
मोलगी । रविंद्र वळवी

अक्कलकुवा तालुक्यातील काठी व चापडाफळी येथील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्या अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सुमारे २०० हून अधिक विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत असताना गळकी छप्परे, तडे गेलेल्या भिंती, कोसळणारे प्लास्टर व तुटलेल्या खिडक्या-दरवाजांमुळे अपघाताची भीती कायम आहे. पावसाळ्यात वर्गांमध्ये पाणी साचते, तर काही ठिकाणी विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर बसवून शिकवावे लागत आहे.प्रवेशोत्सवासाठी ढोल-ताशे व मिरवणुका होत असताना प्रत्यक्षात शाळांच्या इमारतींची दुरवस्था दुर्लक्षित का, असा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे. अनुसूचित जमातींसाठीच्या 'आदि आदर्श ग्राम विकास' योजनेअंतर्गत प्रस्तावित कामेही प्रशासकीय अडथळ्यांमुळे रखडल्याचे सांगितले जात आहे. मुख्याध्यापक, माजी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे नव्या वर्गखोल्यांच्या बांधकामाची मागणी केली असून, शासनाने तातडीने दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी निधी मंजूर करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077